अस्सल सोलापुरी

# सुराज्य

सोलापूर

सोलापूर, पुणे, सांगली, धाराशिव, लातूर, विजयपूर, कलबुर्गी, बिदर, बीड

## अशोक सराफ यांना महाराष्ट्र भूषण पुरस्कार



**मुंबई** : ज्येष्ठ मराठी चित्रपट आणि नाट्य अभिनेते अशोक सराफ यांना कला क्षेत्रातील भरीव योगदानासाठी २०२३ वर्षाचा मानाचा महाराष्ट्र भूषण पुरस्कार देण्याची घोषणा मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी केली आहे.

मुख्यमंत्र्यांनी अशोक सराफ यांच्याशी बोलून त्यांचे अभिनंदनही केले. अशोक सराफ यांनी केवळ विनोदीच नव्हे तर गंभीर स्वरूपापासून ते खलनायकी प्रवृत्तीपर्यंत विविध छटांचे दर्शन आपल्या अभिनयातून घडविले आणि रसिकांवर अधिराज्य गाजवले असे मुख्यमंत्र्यांनी त्यांचे अभिनंदन करतांना म्हटले आहे. अशोक सराफ यांनी आत्तापर्यंत विविध सिनेमांमध्ये आणि नाटकांमध्ये अभिनय केला आहे. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी त्यांच्या एक्स हँडलवरुन ही माहिती दिली आहे. अशोक सराफ यांनी विनोदी, गंभीर आणि खलनायकी भूमिकाही साकारल्या आहेत. तसंच आपल्या अभिनयातून रसिकांच्या मनावर राज्य गाजवलं आहे. अशोक सराफ हे एक लोकप्रिय अभिनेते आहेत. मराठी आणि हिंदी चित्रपटसृष्टीमध्ये त्यांनी त्यांची कारकीर्द गाजवली आहे. लक्ष्मीकांत बेर्डे आणि अशोक सराफ यांची जोडी खूप गाजली होती. हम पांच या मालिकेतला त्यांचा अभिनय केला आहे. निवेदिता जोशी या त्यांच्या पत्नी आहेत.

www.surajyadigital.com | बुधवार, दि.३१ जानेवारी २०२४ | वर्ष : २२ वे | अंक : १२२ वा | किंमत : ५ रुपये | पाने ८

# कोंडी अखेर फुटली; वंचित वरचढ ठरली

## महाविकास आघाडीची ताकत वाढली

सुराज्य/विशेष प्रतिनिधी

**आगामी लोकसभा तसेच त्यानंतरच्या विधानसभा निवडणुकीसाठी महाराष्ट्रात प्रत्येक राजकीय पक्षांकडून रणनीती आखली जात आहे. कुठलेही मतभेद नसल्याने सत्ताधारी महायुतीची नौका सुसाट आहे तर विरोधी पक्षातील महाविकास आघाडीत मात्र धुसपूस सुरू होती. शरदराव यांचे पुतणे अजितदादा यांचा गट सत्तेत गेला तर उद्धव ठाकरे यांचे ४० आमदार शिंदे गटात गेले. त्यामुळे शरदराव आणि ठाकरे यांची ताकत भलतीच कमकुवत झाली होती. या दोघांनाही आणखी एका मित्र पक्षाचा टेकू हवा होता. राज्यात निर्णायक मते असलेल्या वंचित बहुजन विकास आघाडी हा एक पक्ष पवार- ठाकरे यांच्यापुढे होता. या दोघांची सहमती होतीच पण काँग्रेस नेत्यांकडून कां-कू सुरू होती. हा आडमुठेपणा पाहून आंबेडकरांनी गेल्याच आठवड्यात काँग्रेस नेत्यांचे कान उपटले. काँग्रेस अखेर सरळ झाली. 'वंचित' वरचढ ठरली. वंचितचा आघाडीत समावेश झाल्याने एकीची कोंडी फुटली. त्यामुळे महाविकास आघाडीची ताकत वाढली आहे.**

आगामी लोकसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर महाविकास आघाडीकडून जोरात तयारी सुरू झाली आहे तसेच, सत्ताधाऱ्यांविरोधात मोट बांधण्याकरता अनेक लहान-मोठ्या पक्षांना आघाडीत सामील करून घेतले जात आहे. गेल्या काही दिवसांपासून महाविकास आघाडीत सामील होण्याकरता वंचित बहुजन आघाडीकडून इच्छा व्यक्त केली जात होती.

भाजपाविरोधात आपण सर्वांनी एकत्र आले पाहिजे, असे वंचितचे अध्यक्ष प्रकाश आंबेडकरांचे म्हणणे होते. परंतु, महाविकास आघाडीतील इतर घटकपक्षांबरोबर वंचितचे असलेले राजकीय मतभेद पाहता हे गणित जुळून येणे कठीण होते. परंतु, मंगळवारी वंचित बहुजन आघाडीला महाविकास आघाडीत सामील करून घेतले गेले. काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांनी यासंदर्भातील घोषणा पोस्ट एक्सवर केली.

आगामी लोकसभा निवडणुकीच्या जागा वाटपासंदर्भात चर्चा करण्याकरता महाविकास आघाडीकडून नरीमन पॉइंट येथील ट्रायडंट हॉटेलमध्ये बैठकीचे आयोजन करण्यात आले होते. या बैठकीला वंचित बहुजन आघाडीलाही आमंत्रण देण्यात आले. त्यानुसार, वंचितचे प्रवक्ते धैर्यवर्धन पुंडकर उपस्थित होते. महाविकास आघाडीमध्ये वंचित बहुजन आघाडी घटकपक्ष असल्याचे अधिकृत पत्र द्यावे अशी मागणी धैर्यवर्धन पुंडकर यांनी केली होती. त्यानुसार, ठाकरे गटाचे संजय राऊत, काँग्रेसचे नाना पटोले आणि राष्ट्रवादीचे शरद पवार यांच्या सह्यानिशी महाविकास आघाडीच्या पत्रावर वंचित बहुजन आघाडीला महाविकास आघाडीत समाविष्ट करून घेण्यात आल्याचे अधिकृतरित्या जाहीर करण्यात आले आहे.



**पटोलेंना दिले होते टोले... :** २५ जानेवारीला आघाडीची बैठक झाली. त्याचे निमंत्रण वंचित आघाडीला नव्हते. तरी देखील निमंत्रण पाठवल्याचे काँग्रेस अध्यक्ष नाना पटोले यांनी सांगितले होते. याप्रकरणी आंबेडकर भडकले होते. तुमच्या डोक्यात केमिकल लोचा झाला आहे. माईंड गेम खेळू नका, अशा शब्दात आंबेडकर यांनी पटोलेंना टोले दिले होते.

### आवाज उठवताच पत्र आले...

दरम्यान, आज ट्रायडंट हॉटेलमध्ये बैठक सुरू असताना वंचितचे प्रवक्ते धैर्यवर्धन पुंडकर यांना एक-दीड तास बाहेर बसवून ठेवण्यात आलं होतं.यामुळे वंचितचा अपमान झाल्याची प्रतिक्रिया त्यांनी माध्यमांसमोर दिली. त्यांतर लागलीच महाविकास आघाडीकडून वंचितला आघाडीत सामील करून घेतले असल्याचे जाहीर केले गेले.

### पत्रात काय म्हटलं आहे?

देश अत्यंत गंभीर परिस्थितीतून मार्गक्रमण करीत आहे. महान लोकशाही परंपरा असलेला देश हुकूमशाहीकडे जातो आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी भारताला महान संविधान दिले. व्यक्ती स्वातंत्र्य व लोकशाहीचा पुरस्कार केला. आज हे सर्व पायदळी तुडवले जाते आहे. २०२४ साली देशात झुंडशाहीने वेगळा निकाल लावला तर बहुदा ही शेवटचीच निवडणूक ठरेल, अशी शंका लोकांना वाटते. ही परिस्थिती बदलून राज्यात व देशात परिवर्तन घडवावे, यासाठी महाविकास आघाडीची स्थापना झाली, हे आपण जाणताच. आपण स्वतः देशातील हुकूमशाही विरुद्ध लढत आहात. आम्ही त्याबद्दल आपले आभारी आहोत. वंचित बहुजन आघाडीने यापुढे अधिकृतपणे महाविकास आघाडीत सामिल व्हावे, अशी आमची भूमिका आहे, असं या पत्रात म्हटलं आहे.

### शुक्रवारी गृहप्रवेश

याबाबत ठाकरे यांचे राईट हँड संजय राऊतांनी एक्सवर पोस्ट करून २ फेब्रुवारी रोजी होणाऱ्या महाविकास आघाडीच्या बैठकीत वंचित बहुजन आघाडी पक्ष सहभागी होणार असल्याचे सांगितले. 'वंचित'मुळे देशातील हुकूमशाहीविरोधातील लढ्याला बळ मिळेल. भारताचे संविधान धोक्यात आहे. एकत्र येऊन संविधान वाचवावं लागेल, असेही राऊत म्हणाले.

## अल्पवयीन मुलीचा पाठलाग करुन रस्त्यावर अडवले

### विनयभंगासह लैंगिक छळाचा गुन्हा

सुराज्य/सोलापूर

अल्पाइन मुलीचा पाठलाग करून तिला रस्त्यावर अडवून अडवल्याप्रकरणी विनयभंगासह लैंगिक छळाचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. इयत्ता दहावीमध्ये शिक्षणाऱ्या अल्पवयीन मुलीचा पाठलाग करुन रस्त्यावर अडवले आण तिला दोरीने डोळ्यावर, चेहऱ्यावर, पाठीवर मारहाण करुन जखमी करण्याची धक्कादायक घटना शहरातील एका परिसरात घडली.याप्रकरणी विजापूर नाका पोलीस ठाण्यात पीडितेच्या मामीने तक्रार केल्याने बसप्पा रंगप्पा शेंडगे याच्याविरुद्ध विनयभंगासह लैंगिक छळाचा गुन्हा नोंदला आहे.



यातील फिर्यादीत म्हटले आहे की,पिडिता ही तिचे वडील मयत झाल्याने तिच्या मामा-मामीकडे गेल्या अनेक वर्षांपासून शहरातील एका परिसरात राहतात.ती दहावीला आहे. गेल्या चार-पाच महिन्यांपासून एक मुलगा तिचा पाठलाग करीत असल्याचे तिने मामीला सांगितले होते. मात्र त्याचे नाव पत्ता नसल्याने त्याकडे दुर्लक्ष करण्यात आले.रविवारी शाळेत दहावीचे सराव पेपर असल्याने ती शाळेला निघाली होती. सकाळी पावणे आठच्या दरम्यान, वरील आरोपीने तिची सायकल अडवून दोरीने तिला मारहाण सुरु केली.यात तिच्या डोळ्यावर, चेहऱ्यावर व पाठीला गंभीर दुखापत झाली.या प्रकाराची पिडितेच्या मामीला फोनवरुन माहिती मिळाली.

दरम्यान जखमी अवस्थेत पिडितीला शासकिय रुग्णालयात दाखल करण्यात आले.त्यानंतर विजापूर नाका पोलीस ठाणे गाठून तक्रार दिली.त्यानुसार वरीलप्रमाणे गुन्हा नोंदवला आहे.पुढील तपास फौजदार दाईंगडे करीत आहेत.

## उत्तर कसब्यात वृद्धाची आत्महत्या

**सोलापूर** : शहरातील उत्तर कसबा परिसरात राहणाऱ्या एका ६२ वर्षीय इसमाने राहत्या घरात गळफास घेऊन आत्महत्या केली. ही घटना मंगळवारी दुपारच्या सुमारास उघडकीस आली.

महादेव देवबा लकडे (वय ६२ रा. १०७६ उ.कसबा) असे गळफास घेतलेल्या इसमाचे नाव आहे. आज दुपारी चार वाजेच्या सुमारास त्याचा मृतदेह घरातील छताच्या पंख्याला नायलॉन दोरीने गळफास घेतलेल्या अवस्थेत आढळून आला. या घटनेची नोंद फौजदार चावडी पोलिसात झाली असून यामागचे कारण समजले नाही. पुढील तपास पोलीस करीत आहेत.

## दारुड्या मुलाच्या त्रासाला कंटाळून वृद्ध पित्याची गळफास घेऊन आत्महत्या

सुराज्य/सोलापूर

दारुड्या मुलाच्या नेहमीच्या त्रासाला कंटाळून एका ७२ वर्षीय वृद्ध पित्याने झाडाला गळफास घेऊन आत्महत्या केली. ही घटना मल्लेवाडी (ता. मंगळवेढा) येथे सोमवारी घडकीस आली.



या प्रकरणात मंगळवेढाच्या पोलिसांनी मयताच्या मुलाविरुद्ध आत्महत्येस प्रवृत केल्याचा गुन्हा दाखल केला आहे. अर्जुन शहाजी गायकवाड (वय ७२ रा. मल्लेवाडी) असे गळफास घेतलेल्या वृद्धाचे नाव आहे. काल सकाळी वाजेच्या सुमारास त्यांचा मृतदेह मल्लेवाडी येथील राजपूत यांच्या शेतातील झाडाला दोरीने गळफास घेतलेल्या अवस्थेत आढळून आला होता. दरम्यान या घटनेची फिर्याद मयत अर्जून यांचा दुसरा मुलगा जयवंत गायकवाड (वय ३२ रा. मल्लेवाडी)यांनी पोलिसात दाखल केली. आपला भाऊ राजाराम अर्जुन गायकवाड हा नेहमी दारू पिऊन वडिलांना शिवीगाळ आणि धमकी देत होता. तसेच बऱ्याच वेळा त्यांना गळा आवळण्याचा प्रयत्न केला होता. त्याच्या मानसिक त्रासाला कंटाळूनच आपल्या वडिलांनी आत्महत्या केली. असे त्यांच्या फिर्यादीत नमूद आहे. तपास सहाय्यक निरीक्षक वाघमोडे करीत आहेत.

## फायनान्स ऑफिसजवळ आत्महत्येचा प्रयत्न

**सोलापूर** : सोलापूर -घेतलेल्या कर्जाची परतफेड वेळेत करता येत नसल्याच्या कारणावरून एका इसमाने अंगावर रॉकेल ओतून पेटवून आत्महत्येचा प्रयत्न केला.

ही घटना बार्शी येथील विस्तार फायनान्स कार्यालयाजवळ सोमवारी सायंकाळच्या सुमारास घडली. बाबासाहेब नागनाथ गायकवाड (वय ४२ रा.सुभाष नगर) असे आरोपीचे नाव आहे . त्याने काल सायंकाळी बार्शी येथील सोलापूर रोडवर असलेल्या विस्तार फायनान्स कार्यालया जवळ हप्ते भरणे शक्य होत नसल्याने अंगावर रॉकेल ओतून पेटवून घेण्याचा प्रयत्न केला होता. अशी नोंद पोलिसात झाली. हवालदार वाघमोडे पुढील तपास करीत आहेत.

## मार्केट यार्डातून चोरले तुरीचे पोते

**सोलापूर** : मार्केट यार्डात विकण्यासाठी आणलेले तुरीचे पोते चोरुन नेल्याप्रकरणी तरुणाविरुद्ध तक्रारीनुसार गुन्हा नोंदला आहे.

ही घटना मंगळवारी सायंकाळी मार्केट यार्डातील शिवशक्ती ट्रेडर्स येथे घडली. या प्रकरणी पंडित मोहन धनगर (वय- २८, रा. कोरेवाडी, ता. तुळजापूर) यांनी फिर्याद दिली असून, विराज हुसेनी कांबळे (वय- २४, रा. हनुमान नगर, रमाबाई आंबेडकर नगर, सोलापूर) याच्याविरुद्ध गुन्हा नोंदला आहे. फिर्यादीत म्हटले आहे की, यातील फिर्यादीने ६० किलो वजन असलेले तुरीचे पोते विकण्यासाठी मार्केट यार्डात शिवशक्ती ट्रेडर्स यांच्याकडे आणले होते.

## शेतजमीन नावावर करत नाही म्हणून वडिलास मारहाण

**सांगोला** : शेतजमीन माझ्या नावावर का करत नाही म्हणून वडील दादासो सिताराम गडदे यांना मुलगा विजय सिंह व इतर तिघांनी डोळ्यात चटणी टाकून काठीने मारहाण करून जखमी केले. व जीवे मारण्याची धमकी देऊन निघून गेला अशी घटना जुनोनी येथे गेल्या बुधवारी साडेबाराच्या सुमारास घडली.

याबाबत सांगोला पोलीस स्टेशनमध्ये दादासो गडदे यांनी फिर्याद दिली असून त्यात असे म्हटले आहे की मुलगा विजय तसेच पोपट रामचंद्र गडदे व इतर दोघेजण सह चौघे बुधवारी २४ जानेवारी रोजी दुपारी साडेबाराच्या सुमारास घरी आले व विजय म्हणाला की तुम्ही दोन एकर जमीन माझ्या नावावर करा त्यावेळी वडील दादासाहेब म्हणाले की मी स्वतः दोन एकर जमीन खरेदी केली आहे बाकी आठ एकर जमीन तुझ्या नावावर केली आहे असे म्हणतात विजयने त्याच्या हातातील काठीने जोरात तयार मारले त्यामुळे खाली पडली व त्यानंतर उठले व तेवढ्यात आलो की इसमाने दोन्ही हात धरले माझ्या डोळ्यात चटणी टाकून विजय व गडदे यांनी व काठीने मारहाण केली.

शेजारचे सोपान मारुती शिंगाडे दगडू नारायण शिंगाडे सांगोल्यातील दवाखान्यात दाखल केले येथे उपचार केल्यानंतर आज ३० जानेवारी रोजी सांगोला पोलीस स्टेशनमध्ये फिर्याद दाखल केली असून पुढील तपास सांगोला पोलीस करीत आहेत

### तिसरा डोळा

– प्रकाश पोरे



पीए ठेवलाय, मी कोणत्या पक्षात आहे ते सांगायला !

कल्याण
124-72-589


मुंबई
223-70-280

## भाजपा नेत्याची हत्या; १५ आरोपींना मृत्यूदंडाची शिक्षा

सुराज्य/त्रिवेंद्रम

केरळमधील भाजपाच्या ओबीसी नेत्याच्या हत्येप्रकरणात १५ आरोपींना मृत्यूदंडाची शिक्षा सुनावण्यात आली आहे.

हे सर्व आरोपी बंदी घातलेल्या पॉप्युलर फ्रंट ऑफ इंडिया अर्थात पीएफआय या संघटनेचे सदस्य होते. शनिवारी न्यायालयाने या १५ जणांवर दोषारोप ठेवले होते. त्यानंतर मंगळवारी मावेलीक्कर जिल्हा न्यायालयाने त्यांना मृत्यूदंडाची शिक्षा सुनावली. २०२१ साली भाजपाचे नेते रंजीत श्रीनिवासन यांची हत्या झाली होती. आठ आरोपी प्रत्यक्ष हत्या करण्यात सहभागी होते. तर इतर आरोपींनी या गुन्ह्यात



मुख्य आरोपींना मदत केली होती. केरळमधील भाजपाचे ओबीसी विभागाचे नेते रंजीत श्रीनिवासन यांची १९ डिसेंबर २०२१ रोजी राहत्या घरात निर्घृण हत्या करण्यात आली होती. अलाप्पुझा येथील राहत्या घरात कुटुंबियांसमोरच आरोपींनी रंजीत यांना ठार केले होते. पीएफआय संघटनेवर २०२२ साली बंदी घालण्यात आली होती. अजमल, अनूप, मोहम्मद अस्लम, अब्दुल कलाम उर्फ सलाम, सफरुद्दीन, मन्शद जसीब राजा, नवाज, समीर, नझीर, अब्दुल कलाम, झाकीर हुसैन, शाजी, नैसम आणि शेरनास अश्रफ या १५ आरोपींना जिल्हा न्यायालयाने मृत्यूदंडाची शिक्षा सुनावली.

रंजीत यांच्या पत्नी लिशा यांनी या निर्णयानंतर समाधान व्यक्त केले. हे फक्त एक हत्येचे प्रकरण नाही, तर दुर्मिळातील दुर्मिळ प्रकरण आहे. आमच्या डोळ्यादेखत माझ्या पतीवर हल्ला करण्यात आला आणि त्यांची निर्घृण हत्या करण्यात आली, असे लिशा यांनी सांगितले. मुलीने धाव घेतली. टोळके तिच्या बापावर वार करत होते.

**थरारक घटनाक्रम :** ज्यांची हत्या झाली ते राजकीयदृष्ट्या वयाने तरुण होते. भाजप नेत्याची ज्या पद्धतीनं हत्या केली गेलीय, ते अंगावर काटा आणणारे होते. श्रीनिवास यांची आई मंदिरात गेलेली होती आणि ते स्वत: लहान मुलीला ट्युशनला सोडून घरी परतले होते. सकाळची वेळ होती. त्याच वेळेस दहा एक जणांच्या टोळक्याने त्यांना घरात गाठले आणि त्यांच्यावर सपासप वार केले. चेहऱ्यावर गंभीर जखमा झाल्या. त्याच वेळेस त्यांची मुलगी धावत आली तर हल्लेखोरांनी तिच्यावरही तलवार रोखली. पत्नी मदतीसाठी आली तर तिलाही शस्त्राने धमकावलं गेले. मुलीच्या समोरच हल्लेखोरांनी रणजित श्रीनिवास यांचा जीव घेतला. एका सामान्य कुटूंबातून आलेल्या रणजित श्रीनिवास यांचे राजकीय करिअर सुरु झालं होतं. पण ते बहरण्याच्या आधीच संपले.

## सोमपा नोकर भरतीसाठी १५ ते १७ फेब्रुवारीला परीक्षा

**सोलापूर** : महापालिकेतील ३०२ पदांच्या भरतीसाठी १८ जिल्ह्यातील परीक्षा केंद्रावर १५ ते १७ फेब्रुवारी असे तीन दिवस ऑनलाइन लेखी परीक्षा होणार आहे. उमेदवारांनी महापालिकेच्या वेबसाईवरुन परीक्षा प्रवेशपत्र (हॉल तिकिट) घ्यावे, असे आवाहन सहायक आयुक्त शशिकांत भोसले यांनी सोमवारी केले.

महापालिका टीसीएस कंपनीच्या माध्यमातून नोकर भरतीची प्रकिया राबवित आहे. विविध संवर्गातील ३०२ पदांच्या भरतीसाठी ३१ डिसेंबर २०२३ अखेर अर्ज मागविले होते. राज्यभरातून एकूण २३ हजार ४३० अर्ज प्राप्त झाले. लेखी परीक्षेचे केंद्र निवडण्यासाठी



उमेदवारांना तीन पर्याय देण्यात आले होते. पात्र उमेदवारांची छाननी सुरू आहे. उमेदवारांना एसएमएस अथवा ईमेलव्दारे परीक्षेबाबतची माहिती दिली जात आहे. महापालिकेच्या www.solapurcorporation.gov.in या संकेतस्थळावर परीक्षा प्रवेशपत्र डाऊनलोड करून घ्यावे. प्रवेशपत्रावर परीक्षा केंद्राची माहिती, वेळेचा उल्लेख असेल. उमेदवारांना काही शंका आल्यास टीसीएस कंपनीने दिलेल्या हेल्पलाईन नंबरवर संपर्क करावा.